# <u>प्रेस नोट</u>

दिनांक ०७/०५/२०१९

## मिरा–भाईंदर महानगरपालीका येथील नगरसेवक व खाजगी इसमास लाच स्विकारताना अटक

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | काशिमीरा पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र. २७७/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम(संशोधन २०१८)सन १९८८ चे कलम ७, ७अ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) कमलेश यशवंत भोईर, वय –५० वर्षे, नगरसेवक, प्रभाग क्रमांक १५ ड, मिरा–भाईंदर महानगरपालीका, ठाणे.**<br>**२) गोरखनाथ ठाकुर शर्मा, वय–४८ वषे, लेबर कॉन्ट्रॅक्टर (खाजगी इसम )** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्या राहत्या घराच्या पोटमाळयाचे बांधकाम चालू असून त्यांनी महानगरपालिकेची परवानगी न घेता घराचे बांधकाम चालु केले असून, सदर बांधकाम चालू ठेवण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २५,०००/–रुपये लाचेची मागणी केली व पैसे न दिल्यास महानगरपालिका अधिकारी यांना सांगून चालू असलेले बांधकाम पाडून टाकू असे तक्रारदार यांना सांगुन लाचेची मागणी केली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०६/०५/२०१९ रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून नगरसेवक **कमलेश यशवंत भोईर** यांच्यावतीने खाजगी इसम **गोरखनाथ ठाकुर शर्मा** यांना तक्रारदार यांच्याकडून तडजोडीअंती लाचेचा पहिला हप्ता म्हणुन १०,०००/–रुपये स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले व नगरसेवक कमलेश भोईर यांना ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
अ‍ॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं :– **१०६४**
दुरध्वनी क्र. :– **०२२–२०८१३५९८/२०८१३५९९**
व्हॉटस् अ‍ॅप क्र. :– **९९३०९९७७००**

( डॉ. महेश पाटील )
पोलीस अधीक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे